# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.३१२/२०२२/धुळे**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. मंत्रेश्वर विनय अरुणलाल, रा. ५१, मयुर कॉलनी, देवपूर, धुळे, ता. जि. धुळे | उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, धुळे साक्री रोड, गरुड बाग, नवनाथ नगर, धुळे, ता.जि. धुळे | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, धुळे साक्री रोड, गरुड बाग, नवनाथ नगर, धुळे, ता.जि. धुळे |

**सुनावणी दिनांक — १४/०१/२०२५**

**१. उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| प्रतिनिधी उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | प्रतिनिधी उपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : २१/१२/२०२१

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : प्रथम अपील झालेली नाही. आदेश मिळाला नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २०/०८/२०२०

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ----

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : फेब्रुवारी / मार्च २००१

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**

वैयक्तिक मान्यता प्रस्तावाची मंजुर कार्यालयीन टिपणीसह प्रस्तावाच्या सत्यप्रती माहिती मिळणेबाबत.
वरील विषयान्वये सोशल अॅण्ड कल्चरल असोसिएशन संस्था संचलीत (कुसुंबा) माध्यमिक विद्यालय बसरावळ ता. साक्री, जि. धुळे या शाळेतील शिक्षक श्री. किरण दगडू घरटे व उपशिक्षक श्री. मंत्रेश्वर विनय अरुणलाल यांची दि.२८/०३/२००१ रोजीच्या आपल्या कार्यालयीन पत्र क्र. धुजिप / शिक्षण / माध्य २ / कनेमा / ३७७ / २००१ नुसार श्री. किरण घरटे व श्री. मंत्रेश्वर विनय अरुणलाल याच्या नेमणूकीस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. हि मान्यता घेण्यासाठी सचिव / मुख्याध्यापक सो. माध्यमिक विद्यालय बसरावळ यांनी जमा केलेल्या मान्यता प्रस्तावाच्या सर्व कागदपत्रांची मंजूर कार्यालयीन टिपणीसह माहिती सत्यप्रतींवर साक्षांकित करुन मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, धुळे साक्री रोड, गरुड बाग, नवनाथ नगर, धुळे, ता.जि. धुळे यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०२/११/२०२०

(२) प्रथम अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : -----

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : मागितलेली माहिती दिली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, धुळे साक्री रोड, गरुड बाग, नवनाथ नगर, धुळे, ता.जि. धुळे यांनी कोणतेही आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा –**

१) अपीलार्थी यांचे प्रतिनिधी - अपीलार्थी यांच्या माहिती अर्जानुसार कोणतीही कार्यवाही केलेली नाही अथवा कोणतीही माहिती दिली नाही तसेच प्रथम अपीलही लावलेले नाही. तरी माहिती अधिकार अर्जानुसार संपूर्ण माहिती सत्यप्रतींवर साक्षांकित करुन तात्काळ मिळण्याचे आदेश व्हावेत.
२) विद्यमान जन माहिती अधिकारी - तत्कालीन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहिती अर्ज व प्रथम अपील अर्ज प्राप्त झालेला नसल्याचे सुनावणी दरम्यान स्पष्ट केले.

६. **निष्कर्ष –**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.
२) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून कोणतेही आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.
३) अपीलार्थी यांनी माहिती अर्ज व प्रथम अपील दाखल केल्याबाबतचा कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केल्याचे दिसून येत नाही.
४) अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती स्वत:बद्दलची असल्याचे दिसून येते.
५) अपीलार्थी यांना अद्यापही माहिती अप्राप्त असल्याचे दिसून येते.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, धुळे साक्री रोड, गरुड बाग, नवनाथ नगर, धुळे, ता.जि. धुळे यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलार्थीस त्यांच्या दिनांक २०/०८/२०२० रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात अपीलार्थी यांची स्वत:ची कार्यालयातील उपलब्ध माहिती / वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपीलार्थी यांना पाठवावे.
२. प्रस्तुत द्वितीय अपिल क्रमांक ३१२/२०२२/धुळे निकाली काढण्यात येत आहे

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

जावक क्र. ५६४२ दिनांक : 14 JUL 2025